ISSN - 2229 - 4929

# अक्षर वाङ्मय

४ मार्च २०२०



## स्त्रीवादी साहित्य विशेषांक

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

Scanned by CamScanner

| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| ३६. | स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवादी साहित्य | उज्वला सुशांत पाटील | १९७ |
| ३७. | आदिवासी कातकरी जमातीच्या लोकगीतातील'स्त्री' चित्रण | स्नेहल जयराम साबळे | २०४ |
| ३८. | लोकसाहित्यातून उमटलेले स्त्री चित्रण लोकसाहित्यातील स्त्री जीवन : एक अभ्यास | वर्षा बाळासो तांदळे | २०९ |
| ३९. | दलित स्त्री आत्मकथनाचे स्वरूप | बाळासो आण्णा सुतार | २१३ |
| ४०. | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या आत्मचरित्रातील स्त्रीवादी जाणिवा | डॉ. प्रीती पाटील | २१७ |
| ४१. | स्त्रीवादी साहित्य : नवी दिशा आणि आव्हाने | डॉ. विशाल प्रकाश लिंगायत | २२१ |
| ४२. | लोकसाहित्यातील लोकगीतातून उमटलेले स्त्री चित्रण | विजयकुमार शंकरराव शिंदे | २२६ |
| ४३. | स्त्रीवादी साहित्य समीक्षा | राजकुमार दादाराव तरडे | २३० |
| ४४. | विभावरी शिरुरकरांच्या 'कळ्यांचे निःश्वासमधील स्त्रीचित्रण | धनश्री विश्वास पाटील | २३३ |
| ४५. | स्त्रीवादी संकल्पना आणि अनुराधा वैद्य | भारत रामजी बांडे | २३६ |
| ४६. | 'तीन दगडाची चूल' मधील स्त्रीवादी जाणिवा | डॉ. नम्रता हत्तळगे | २४० |
| ४७. | स्त्रीवाद आणि मराठी साहित्य (भूमी या कादंबरीच्या अनुषंगाने) | प्रियंका अशोक कुंभार | २४५ |
| ४८. | समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहीत्य | मंगेश पंढरीनाथ जोर्वेकर | २५० |
| ४९. | स्त्रीवादी साहित्य : नवी दिशा आणि आव्हाने | अमोगसिध्द शिवाजी चेंडके | २५५ |
| ५०. | लोकगीतातून अभिव्यक्त होणारी स्त्रीप्रतिमा | सीमा राजेश वीर | २६१ |
| ५१. | स्त्रीवादी चळवळीच्या आद्य प्रणेत्या पंडिता रमाबाई यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार | डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | २६७ |
| ५२. | स्त्रीवादी प्रतिबिंबित : रीटा वेलिणकर | मच्छगंधाली नितीन तारळेकर | २७१ |




Scanned by CamScanner

# स्त्रीवादी प्रतिबिंबित : रीटा वेलिणकर

मच्छगंधाली नितीन तारळेकर

श्री.आर.आर पाटील महाविद्यालय, सावळज, ता.तासगाव, जि.सांगली

**प्रास्ताविक :**

मानवी समाजामध्ये मानवी जातीचे स्त्रीव पुरुष असेदोनसमूहजाती दिसून येतात.या दोन समूहामध्ये त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार तसेच त्यांच्या अंतर्गत गुणधर्मानुसार नेहमीच भेद केलेला दिसून येतो.पूर्वीपासून समाजामध्ये पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांवर अनेक प्रकारचा अन्याय अत्याचार झालेला असून, तिची मानसिक भावनिक आणि शारीरिक कुचंबणा झालेली अनेक ग्रंथांमध्ये तसेच पूर्वीच्या साहित्यामध्ये दिसून येते अशा अस्तिवशून्य झालेल्या या स्त्रीला समाजात नेहमीच दुय्यम स्थान प्राप्त झालेले आहे. तिच्याकडेमाणूस म्हणून ना पाहता केवळ एक वस्तू म्हणून पाहिले जाते. समाजामध्ये तिचे स्थान हे कमी दर्जाचे मानले जाते. तिला तिचे हक्क आणि अधिकार प्राप्त करण्यासाठी नेहमीच संघर्ष करावा लागतो.

पाश्च्यात देशात स्त्रीयाने हक्कासाठी व स्वातंत्रासाठी स्त्रीवादीचळवळी सुरु केल्या. १६७४ मध्ये सर्वप्रथम स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी मार्गारेट बेटन ने विधानसभेत मागणी केली होती. लेखिका ऑलिंच द गुंझ हिने १७९० मध्ये स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये पुरुषाप्रमाणे स्त्रीला स्वतंत्र व साम्नानाने जगण्याचा हक्क मागितला. तसेच'सिमेका फॉल्य' म्हणून ओळखला जाणारा म्हणजे १९४८ चा स्त्री स्वतंत्राचा जाहीरनामा होय. यामध्ये मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे पाहता येतील.

१. सर्व स्त्रीपुरुष समान आहेत.

२. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीपुरुष उच्चनीचभेद करून स्त्रियांवर अन्याय केला आहे.

३. स्त्रियांना समान हक्क, समान शिक्षण, आर्थिक स्वतंत्राचा व मतदानाचा तसेच राजकीय जीवनात सहभागी होण्याचा अधिकार मिळावा इ. मुद्दे मांडलेले आहेत.

भारतामध्ये ही विसाव्या शतकात स्त्रीवादी चळवळीला सुरुवात झाली. 'स्वतंत्र-समता-बंधुता' या त्रिसूत्रींच्या आधारे समाजात स्त्री पुरुष समानतेची जाणीव झाली. पाश्चिमात्य स्त्रीवादाचा प्रभाव पडून भारतात स्त्रीवादी साहित्य अस्तित्वात आले.

**स्त्रीवाद या संकल्पनेवर प्रकाश टाकणाऱ्या व्याख्या :**

१ **डॉ. विद्युत भागवत :** "खाजगी सामाजिक, आर्थिक, राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या दडपणुकीबद्दल झगडण्याची तयारी असणे म्हणजे स्त्रीवादाचा अंगीकार करणे होय."



Scanned by CamScanner

२. डॉ. मंगल वरखेडे : "पुरुषप्रधान संस्कृतीने ज्या मानवी हक्कांपासून स्त्रियांना वर्षानुवर्षे वंचित केले ते हक्क मिळवण्यासाठी स्त्रियांनी स्त्रियांच्या: व्यक्ती स्वातंत्र्यासाठी विचार स्वातंत्रासाठी आणि राजकीय हक्कांसाठी केलेली चळवळ म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय."

**मराठी साहित्यातील स्त्रियांचे स्त्रीवादी लेखन**

मराठी मध्ये १९६० नंतर स्त्रीवादी दृष्टिकोन समोर ठेवून लेखन केले जाऊ लागले. यामध्ये विद्या बाळ, छाया दातार, शांता किर्लोस्कर, गीता साने या होय. १९७३ मध्ये 'चंद्रप्रभा विरहवर्णन' ही स्वतंत्र कादंबरी साळूताई तांबवेकर यांनी लिहली. स्त्रियांचा माणूस म्हणून विचार केला जावा, तसेच स्त्रीला शिक्षण स्वातंत्र व विवाहपद्धती बदलाव्या यासाठी अनेक लेखिका साहित्यातून स्त्रियांच्या व्यथा वेदना मांडत होत्या,त्यामध्ये विभावरी शिरुरकर; 'बळी' (१९५५), प्रेमा कंटक; 'काम आणि कामिनी' (१९३०), गीता साने यांची' माळरान' (१९४१) इ. होय.

अन्याय, अत्याचार, शोषण याविषयी स्त्रिया व्यक्त होऊ लागल्या. त्यामुळे'स्त्रीमुक्तीचीचळवळ' उभारली गेली. यामध्ये समाजसुधारकांचे योगदान महत्वाचे आहे. यातून स्त्रियांना जाचक बंधनातून मुक्त केले. १९६० नंतर स्त्रीवादाचा प्रभाव समाजावर पडला. त्यामुळे स्त्रियांच्या साहित्यातही स्त्रीवाद दिसू लागला. १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष' म्हणून जाहीर झाले. १९८० नंतर च्या काळात स्त्रियांच्या साहित्यातून स्त्रीवाद दिसू लागला. स्त्रीवादी विचारांचा प्रवाह हा स्त्रियांच्या आत्मशोधाकडे आणि समाज परंपरा कुटुंबव्यवस्था अशा व्यापक परीघाकडे वळला. अशाचप्रकारेस्त्रियांनी स्वत्वाचा शोध घेतला आहे. हा विचार शांता गोखले यांनी आपल्या रीटा वेलिणकर या कादंबरीत मांडला आहे.

**रीटा वेलिणकर या कादंबरीतील स्त्रीवाद :**

शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' ही कादंबरी १९९० मध्ये प्रकाशित झाली आहे. या कादंबरीमध्ये समाजव्यवस्था व कुटुंबव्यवस्था यात होणारी स्त्रीची घुसमट रीटा च्या माध्यमातून व्यक्त झाली आहे. निर्सार्गाच्या नियमानुसार स्त्री-पुरुषांमध्ये असलेले शारीरिक आकर्षण याचे गूढ उकलण्याचे काम व्हर्जेनिया वूल्फ यांनी केले आहे. त्या म्हणतात स्त्री लिहण्यास बसली की तिला तिचेचअंतर्मन सांगते की, 'तू स्त्री आहेस' हे तू लिहता कामा नये' असे वारंवार स्त्रीचे मन तिला सुचवते, माणसाच्या जीवनात अनेक प्रकारची दुःखे येतात, व ती भोगन्यावाचून त्याला पर्याय नसतो हा विचार रीटाच्या माध्यमातून लेखिकेने मांडला आहे. स्त्रीला देह आहे तसेच मन आहे या स्त्री मनाचा शोध लेखिकेने या कादंबरीत घेतला आहे. समाजातील जात व्यवस्था आहे याचा परिणाम विवाह व्यवस्थेवर होतो, हे रीटाच्या आई वडिलांचा आंतरजातीय विवाहावरून दिसते. त्याचा परिणाम रीटाच्या बहिणींच्या विवाहावेळी जाणवतो. रीटा स्वतःच्या हिमतीवर आपल्या लहान बहिणींचीलग्ने करते. स्वतःचा विचार बाजूला ठेऊन ती कुटुंबासाठी आपल्या इच्छा – आकांक्षा मारून जीवन जगते वयाच्या १८ व्या वर्षापासून ती साळवी नावाच्या गृहस्थाला ओळखते, त्यांच्याओळखीचे रुपांतर मैत्रीत होऊन पुढे प्रेमात होते. एका विवाहित पुरुषाशी म्हणजे साळवीशी तिचे प्रेमसंबंध व शारीरिक संबंध सात वर्षे असतात. पण ज्यावेळी रीटा साळवी बरोबर लग्न करण्याचा विषय काढते, तेव्हा तो तिला नाकारतो यावर रीटा



Scanned by CamScanner

म्हणते " आपल्या समाजातपुरुष आणि स्त्री यांच्यात एकच नात लावून देण्याची लोकांना फार खोड असते. जरासा संशय आला की, लागल्या जीभा वळवळायला मला त्याचा काहीच त्रास होणार नाही, पण बाई ला होतो." (पृष्ठ.३०) समाजाला न जुमानता तिला साळवी बरोबर प्रेमाच्या नात्याने उघड उघड जगायचे आहे.

स्त्रीवादी विचारांच्या नायिका जिद्दी असतात. विरोध मोडून काढतात व जाणीवपूर्वक निर्णय घेतात. शांता गोखले यांच्या कादंबरीतील नायिका रीटा ही अशाच विचारांची आहे. रूढी रिती-रीवाजांच्या चाकोरी बद्धतेचा तिटकारा तिला आहे. रीटा चे दुखः जाणायची क्षमता फक्त तिची बाल मैत्रीण म्हणजेच सरस्वती मध्ये आहे.रीटा ने सरस्वती ला पत्र लिहले त्यात रीटा म्हणते "सरस्वती आपण आयुष्यभर एकाच पुरुषाला ओळखण्याच्या प्रयत्नाला बांधलेलो असतो" (पृष्ठ.क्र.४६) यामध्ये स्त्रीत्वासाठी रीटा लढत असलेली दिसते. सरस्वती म्हणते "बापाने विकत घेतलेल्या माणसावर अवलंबून आपण जगलो आपला नवरा बाहेरख्याली झाला तर आपले शरीर स्वतंत्र होईल" असे दुखः व्यथा वेदना सांगण्यासाठी लेखिका येथे अनेक पात्रांचा मार्ग अवलंबते या कादंबरीत स्त्रीत्वाची जाणीव प्रकर्षाने जाणवते स्त्रीने शारीरिक, आर्थिकव भावनिकदृष्ट्या कोणावरही अवलंबून न राहता स्वतः आत्मनिर्भय आणि स्वतंत्र जगणे किती अवघड आहे हे या कादंबरीतून मांडले आहे.

**समारोप :**

शांता गोखले यांच्या रीटा वेलिणकर या कादंबरीत स्त्रीवादी भूमिका रीटाच्या पात्रातून पहावयास मिळते. त्याचबरोबर सरस्वती, संगीता या पात्रातूनहीस्त्रियांच्या दु:खाचे होणार्या मानसिक कुचंबनेचे प्रतिबिंब या कादंबरीत पहावयास मिळते.इतर कादंबर्यात असणार्या स्त्री-पुरुष संबंधाची चित्रणे आहेत, पण शांता गोखले यांनी या कादंबरीतून छेद दिला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. डॉ. महाजन वंदना : मराठीकादंबरीतील स्त्रीवाद, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे. आ.प्र.७ नोव्हेंबर २०१०
2. शांता गोखले : रीटा वेलिणकर, मौज प्रकाशन मुंबई, आ.प्र.१९९०



Scanned by CamScanner